# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/07/2023 (शुक्रवार) सकाळ

---

## जिवानाशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील नागपूर डीस्ट्रीक्ट सेंट्रल कोऑपरेटीव्ह बॅकचे समोर खापरखेडा येथे दिनांक १३/०७/२०२३ चे २३.१५ वा. ते २३.३० वा. दरम्यान यातील चौकीदार **आरोपी नामे— शुभम उईके,वय २९ वर्ष, रा. सिल्लेवाडा खापरखेडा** याने दिनांक १३/०७/२०२३ रोजी ११.१५ वा. दरम्यान नागपूर जिल्हा मध्यवर्ती बॅकेच्या इमारतीजवळ मृतक नामे— महेंद्र सोमकुवर, वय ५५ वर्ष, रा. खापरखेडा याला नमुद घटनास्थळी शिवीगाळ केल्याचा राग मनात धरून जिवे मारण्याच्या उद्देशाने लाकडी दांडक्याने त्याच्या डोक्यात व अंगावर वार करून जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मोहम्मद नौशाद वल्द मोहम्मद शहीद, वय २२ वर्ष, रा. वार्ड नं. ०४ अंन्सार नगर चनकापूर ता. सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक दिपक कॉक्रेटवार मो. नं. ८३२९६६६६७८ पोलीस स्टेशन खापरखेडा हे करीत आहे.

## टायर चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

फिर्यादी नामे— विशाल आनंद जांभुळकर, वय ४० वर्ष, रा. १ प्लाट नं. ४१ सन्यालनगर टेकानाका नागपुर यांचे आयसर टॅकर १४ चक्का क्र. एम. एच.— २२/ ए.एन.— १९६४ हा १५ दिवसापासुन खराब झाल्याने कन्हान रिंग रोड हायवे इन हॉटेलचे मागे उभा केला असता दिनांक ३०/०६/२०२३ रोजी हॉटेल हायवे इनचे मालकाने फोन करून सांगीतले की तुमचा टॅकर एम. एच.— २२ ए. एन १९६४ चे टायर चोरी झाले आहे. यावरून फिर्यादी याने तेथे जावुन बघीतले असता सदर टॅकरचे सीइएटी कंपनीचे ६ टायर डिस्क कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोस्टे कुही येथे अप क्र. ४४३/२३ कलम ३७९ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे समांतर तपासा दरम्यान दि. १३/०७/२०२३ रोजी पो.स्टे. कन्हान अप. क्र. ४४३/२३ कलम ३७९ भा.द.वी. चे गुन्ह्यात आरोपी यांचा शोध घेत असता गुप्त माहिती वरुन सदर गुन्ह्यात सिहोरा गावातील संशयित आरोपी नामे— **१) सागर देवीदास हुमणे वय २२ वर्ष रा. सिहोरा** यास ताब्यात घेऊन त्याला सदर गुन्हयाबाबत सखोल विचापुस केली असता सदर गुन्हा ईतर तीन इसम नामे— **२) अंकीत दुर्योधन बागडे, वय २३ वर्ष, रा. सिहोरा ३) निकेश नामदेव वासनिक, वय २२ वर्ष, ४) फरार— आनंद मेश्राम** यांचे सोबत केल्याची कबूली दिली व सदर गुन्हयातील मुद्देमाल हा आपले घरामागे लपवून ठेवल्याचे सांगितले वरून त्याचे घराचे मागून गुन्हयातील सहा ट्रॅक टायर डिस्कसह किंमती अंदाजे ६०,०००/— रू. मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे. नमूद आरोपी यांची मेडिकल तपासणी करुन मुद्देमाल व आरोपीतांसह पूढील तपास कामी पो.स्टे. कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. विशाल आनंद सर (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक अनील राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राऊत, ईकबाल शेख, पोलीस शिपाई अभिषेक देशमुख यांनी पार पाडली.




**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**